**व्यवसाय / धंदा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटसॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७९ वा | गुरुवार, दि. १९ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# तिसऱ्या भाषेच्या नावाखाली 'हिंदी' लादण्याचा कट

## फडणवीसांनी माय मराठीच्या छातीत सुरा भोसकून घात केला! काँग्रेसची टीका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात पहिली ते पाचवीपर्यंत इंग्रजीबरोबर हिंदी भाषाही सक्ती करण्याचा निर्णय सरकारने मागे घेतला. मात्र तिसऱ्या भाषेच्या नावाखाली 'हिंदी' लादण्याचा सरकारचा कट नवीन जीआरमधून समोर आला आहे.

मागच्या शासननिर्णयातील 'अनिवार्य' हा शब्द काढून त्या ठिकाणी 'सर्वसाधारण' असा शब्द टाकण्यात आला असून मुलांना तिसरा पर्याय हिंदीचाच असणार आहे. हिंदी ऐवजी तृतीय भाषा म्हणून इतर भाषा शिकायची असल्यास किमान 20 विद्यार्थी हवेत अशी अटही घातली आहे. त्यामुळे फडणवीस सरकारची चालबाजी उघड झाली असून नेटकऱ्यांनी सरकारवर सडकून टीका केली आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण 2024 नुसार यापुढे इयत्ता पहिली ते पाचवी साठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य असेल. अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता सहावी ते दहावी करिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण प्रमाणे




असेल, असा निर्णय सरकारने घेतला होता. मात्र याला विरोध झाल्यानंतर सरकारने माघार घेतली आणि हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतला. मात्र नवीन जीआर काढताना चालबाजी केल्याचे आता उघड झाले आहे.

इयत्ता पहिली ते पाचवी साठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या राज्य मंडळाच्या शाळांमध्ये हिंदी भाषेच्या अनिवार्यतेबाबत महाराष्ट्र सरकारने एक नवीन जीआर जारी केला आहे. यात नमूद करण्यात आले आहे की, राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण 2024 नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवी साठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल; परंतु या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास, त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही ट्विट करत फडणवीस यांच्यावर हल्ला चढवला. फडणवीस यांनी माय मराठीच्या छातीत सुरा भोसकून घात केला, असा घणाघात सपकाळ यांनी केला.

फडणवीसांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या आणि माय मराठीच्या छातीत सुरा भोसकून घात केला आहे. तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती रद्द केली' असं सांगून जनतेची फसवणूक केली गेली. पण सरकारचा जीआर काय सांगतो? हिंदी हीच सक्तीची तिसरी भाषा असणार. इतर कोणतीही भाषा शिकायची असल्यास किमान 20 विद्यार्थ्यांची अट घालण्यात आली आहे. म्हणजेच पयार्याचा देखावा आणि हिंदी लादण्याचा ठरवलेला कट आहे. हा भाजपचा महाराष्ट्रद्रोही अजेंडाच असून हे मराठी भाषा, मराठी अस्मिता आणि मराठी माणूस यांना संपवण्याचे कारस्थान आहे. फडणवीस, शिंदे, अजित पवारांची निष्ठा ही महाराष्ट्राशी, मराठी माणसांशी नाही दिल्लीश्वरांशी आहे हेच यातून स्पष्ट होते, असेही सपकाळ म्हणाले.

वारंवार बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेणा-या शिंदे गटाकडेच शिक्षणखाते असून त्यांनी शिवसेनेच्या पाठीत खंजीर खुपसला तशाच प्रकारे मराठीचा खून पाडण्याची सुपारी घेतली आहे. अजित पवार सत्तेसाठी इतके लाचार आहेत की त्यांना तर महाराष्ट्र, मराठी भाषा, मराठी माणूस जगले काय मेले काय? याच्याशी काही देणे घेणे नाही. फक्त आपल्याला अर्थखातं मिळावे हेच अजित पवारांचे धोरण आहे. संघ आणि भाजपचा हा "एक राष्ट्र, एक भाषा, एक संस्कृती" चा अजेंडा महाराष्ट्राच्या मुळावर उठला असून तो झुगारून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

## नाराज बळीराम साठेंना 'पवारांकडून' भेटीचे निमंत्रण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हाध्यक्षपदावरून हटवल्यानंतर नाराज झालेल्या राष्ट्रवादी काँग्रसचे ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे यांच्याशी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी फोनवरून चर्चा केली.

तसेच त्यांना प्रत्यक्ष भेटीचे निमंत्रणही पाठवले आहे. यामुळे शरद पवार हे बळीराम साठे यांची कशी नाराजी दूर करणार? ते आपला पक्ष बदलण्याचा निर्णय मागे घेणार का? याची उत्सुकता कार्यकर्त्यांना लागली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदावरून बळीराम साठे यांची चार दिवसांपूर्वी उचलबांगडी झाली. त्यांच्या जागी मोहिते पाटील समर्थक, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यानंतर जिल्हाध्यक्षपदावरून अपमानास्पद पद्धतीने हटविण्यात आल्याचे म्हणत बळीराम साठे आक्रमक झाले आहेत.

हा निर्णय परस्पर झाल्याने बळीराम साठे यांना हा निर्णय रुचला नाही. नुकताच त्यांनी वडाळा येथे कार्यकर्ता मेळावा घेऊन या निर्णयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. विश्वासात न घेता प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी परस्पर रित्या जिल्हाध्यक्ष पदावरून हटवले. नवीन नियुक्ती करतानाही कुठलीही विचारणा न करता परस्पर निर्णय घेतला.

विधानसभा निवडणुकीत मोहोळ विधानसभा मतदारसंघातून सिद्धी कदम हिला जाहीर झालेली उमेदवारी रद्द करून ती राजू खरे यांना देण्यात बळीराम साठे यांचा पुढाकार होता. मोहोळमधील एबी फॉर्म बदलल्यामुळे जयंत पाटील आणि धैर्यशील मोहिते पाटील यांनी आपल्या विरोधात कटकारस्थान करून पदावरून हटविले, असा



साठे यांनी दावा केला.

पक्षात होणाऱ्या नव्या बदलांबाबत विश्वासात घेऊन सांगितले असते, तर आपण पदाचा खुशीने राजीनामा दिला असता. मात्र, नवे बदल करताना कुठेही विश्वासात घेण्यात आलेले नाही, त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. अशा शब्दात साठे यांनी आजपाखड केली होती. तसेच शरद पवार यांच्यावर नाराजी व्यक्त करत पक्ष सोडण्याचाच निर्णयही त्यांनी जाहीर केला होता.

पण गेल्या दोन दिवस चाललेल्या या राजकीय घडामोडीवर शरद पवार यांचे निष्ठावंत कार्यकर्ते संजय पाटील - घाटणेकर यांनी बळीराम साठे यांची भेट घेतली. त्यांचे मत जाणून घेतले आणि आज (बुधवारी) सकाळी बारामती येथे शरद पवार यांची भेट घेतली. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील राजकीय घडामोडी आणि बळीराम काका साठे यांच्या नाराजीवर चर्चा करण्यात आली.

यावेळी शरद पवार यांनी बळीराम साठे यांना वाऱ्यावर सोडणार नाही, असे म्हणत आश्वासित केले आहे. तसेच साठे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला आणि येत्या दोन दिवसात प्रत्यक्ष भेटीसाठी या असा निरोप दिला. यामुळे शरद पवार हे बळीराम साठे यांची कशी नाराजी दूर करणार? बळीराम काका साठे हे आपला पक्ष बदलण्याचा निर्णय मागे घेणार का? याची कार्यकर्त्यांना उत्सुकता लागली आहे.

## 'अरण्यऋषी' मारुती चितमपल्ली यांचे निधन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीतीर्चे पक्षिशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक, अवघे जीवन वनविद्येचा अभ्यास आणि लेखनासाठी समर्पित करणारे व्यासंगी संशोधक व वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांचे सोलापुरात बुधवारी सायंकाळी निधन झाले.

दरम्यान, त्यांना नुकताच राष्ट्रपती यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. काही दिवसांपासून त्यांची तब्येत खालावली होती. त्यांच्यावर सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. बुधवारी सकाळपासूनच त्यांची प्रकृती चिंताजनक होती, सायंकाळी त्यांचे रुग्णालयातच निधन झाले.

सोलापुरातील टी. एम. पोरे स्कूल व नॉर्थकोट टेक्निकल हायस्कूलमधून शालेय शिक्षण आणि दयानंद महाविद्यालयातून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढील व्यावसायिक शिक्षण त्यांनी स्टेट फॉरेस्ट कॉलेज, कोईमतूर आणि बंगळुरू, दिल्ली, कान्हा राष्ट्रीय उद्यान (मध्य प्रदेश), डेहराडून



येथील वने आणि वन्यजीवविषयक संस्थांमधून घेतले. नांदेड येथील संस्कृत पाठशाळेत तसेच पुणे, पनवेल येथील संस्कृत पंडितांकडे संस्कृत भाषेचे व साहित्याचे अध्ययन केले. जर्मन व रशियन भाषांचाही त्यांनी अभ्यास केला. महाराष्ट्र शासनाच्या वनविभागात ढेबेवाडी ते मेळघाट अशी तीस वर्षे त्यांनी सेवा केली. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालक पदावर कार्यरत असताना १९९० साली ते सेवानिवृत्त झाले. कनार्ळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विकासात त्यांचे विशेष योगदान आहे.

## मोहिते पाटील यांचा बलराज देहूकडे रवाना



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांचा मानाचा अश्व बलराज याचे देहूकडे प्रस्थानापूर्वी विधिवत पूजन करण्यात आले.


गत ४० वर्षापासून मोहिते पाटील यांच्या अश्वाला रिंगण सोहळ्यात धावण्याचा मान मिळतो आहे. बलराज या अश्वाबद्दल बोलताना डॉ. धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले, बलराज हा अश्व जयपूर राज घराण्यातील अश्वाच्या कुलतील एक अश्व आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील मानाचा अश्व असल्यामुळे त्याच्या खाण्या पिण्याची वर्षभर योग्य काळजी घ्यावी लागते. समतोल खुराका बरोबरच योग्य व्यायाम करून घ्यावा लागतो. लाखो लोकांच्या गर्दीतून चालताना कोणाला इजा पोहोचवू नये याचे शिक्षण द्यावे लागते.

अश्वपुजना प्रसंगी सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पदमजादेवी मोहिते पाटील, आण्णासाहेब इनामदार, माणिकराव मिसाळ, आण्णासाहेब शिंदे, सतीश पालकर, सुधीर रास्ते, मयुर माने, चंद्रकांत कोळेकर, नवनाथ साठे, राजु गुळवे,ज्योती कुंभार, जनसेवा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'दोन महिन्यांतच पालखीमार्गाला तडे'; वाखरीतील मार्गाचे काम निकृष्ट

### ठेकेदारावर कारवाईची मागणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** वाखरी ते पंढरपूर पालखीमागार्चे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. अवघ्या दोन महिन्यांतच वाखरी येथे पालखीमार्गाला तडे गेले आहेत. त्यामुळे या कामाच्या दजार्बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, हे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून, ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे. मोहोळ ते आळंदी पालखीमार्गाचे काम पूर्ण झाले आहे. पंढरपूर ते वाखरी दरम्यानच्या आठ किलोमीटरचे काम सुरू आहे. कामास सुरवात होऊन दोन वर्षे झाली



तरी अत्यंत संथगतीने हे काम सुरू आहे. काम सुरू झाल्यापासून कामाच्या दर्जाबाबत अनेक तक्रारी राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प अधिकाऱ्यांकडे आल्या आहेत. अशातच पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या कार्यालयासमोर नव्याने तयार करण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे तडे गेलेआहेत.

अवघ्या दोन महिन्यांत सिमेंट रस्त्याला तडे गेल्याने कामाच्या दर्जाबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. येथील मार्गाचे काम पूर्ण होण्याआधीच रस्त्याला तडे गेल्याने स्थानिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान, संबंधित बांधकाम करणाऱ्या कंपनीवर कायदेशीर कारवाई करावी, अशी तक्रार वाखरी ग्रामपंचायतीचे सदस्य संग्राम गायकवाड यांनी नॅशनल हायवेकडे केली आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी प्रकल्प अधिकारी केशव घोडके यांच्याशी अनेक वेळा भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, उशिरापर्यंत त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

> वाखरी-पंढरपूर पालखी महामार्गाला तडे गेल्याची माहिती मिळाली आहे. वारी काळात कोणताही धोका होणार नाही याची काळजी घेतली जाईल. महामार्गाचे प्रकल्प अधिकारी केशव घोडके यांना याबाबत लक्ष देण्याच्या सूचना दिल्या आहेत. उद्या मी स्वतः या महामार्गाची पाहणी करणार आहे. वारीनंतर या कामाबाबत सविस्तर आढावा घेतला जाईल.
>
> **- कुमार आशीर्वाद,** जिल्हाधिकारी, सोलापूर

### डागडुजीनंतरही पुन्हा खचला पुलाच्या बाजूचा भराव

शिवाय येथील पुलाच्या बाजूला टाकण्यात आलेला भरावही खचला आहे. मागील आठ दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे येथील भराव खचला होता. त्यानंतर येथे डागडुजी करण्यात आली होती. त्यानंतरही पुन्हा येथे भराव खचला आहे.




## सर्व यंत्रणांनी गर्दी व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणालीचे काटेकोरपणे प्रशिक्षण घ्यावे - मोनिका सिंह ठाकुर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे सहा जुलै 2025 रोजी आषाढी यात्रा भरणार आहे आषाढी यात्रा कालावधी हा 26 जून ते 10 जुलै 2025 असा आहे या कालावधीत दहा ते पंधरा लाख वारकरी भाविक पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. त्या अनुषंगाने गदीर्चे व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणालीचे काटेकोरपणे अंमलबजावणी प्रशासन करत असते. या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणांनी आपले प्रशिक्षण पूर्ण करून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडावी, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित गर्दी व्यवस्थापन आणि घटना प्रतिसाद प्रणाली बाबतच्या प्रशिक्षणात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर मार्गदर्शन करत होत्या. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, छत्तीसगड येथील इमर्जन्सी अधिकारी विशाल वासवानी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या सहाय्यक अधिकारी अर्चना बिसोई यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर पुढे म्हणाल्या की दिनांक 26 जून ते 10 जुलै या कालावधीत आषाढी वारी पंढरपूर येथे होत असून या कालावधीत सुमारे पंधरा लाख भाविक येण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात या यात्रेचे नियोजन आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत केले जाते. व्यवस्थापनाच्या सुलभतेसाठी तसेच वारकरी भाविकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने केंद्र शासनाने घटना प्रतिसाद प्रणाली लागू केलेली आहे व जिल्ह्यात ही प्रणाली 2015 पासून राबवली जात असून सर्व संबंधित यंत्रणा प्रमुखांनी व त्यांच्या अधिनस्त



अधिकारी कर्मचाऱ्यांनी गर्दी व्यवस्थापन व घटना प्रतिसाद प्रणालीचे अत्यंत बारकाईने प्रशिक्षण पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आषाढी वारी यात्रेतील गर्दीचे व्यवस्थापनाबाबत युनिसेफचे इमर्जन्सी ऑफिसर विशाल वासवानी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये आषाढी वारीत गर्दीचे व्यवस्थापन अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था, सुविधा आणि सेवा, आपत्कालीन नियोजन याबरोबरच कोणत्याही व्यवस्थापनातील यशासाठी महत्त्वपूर्ण घटक असलेला संपर्क या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली. घटना प्रतिसाद प्रणाली आपत्तीजन्य परिस्थिती धोका कमी करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा आहे या प्रणालीद्वारे नियोजन सुयोग्य व सुलभ होते त्यासाठी आवश्यक कामकाजाचा लेखाजोगा ठेवणे व त्यानुसार कारवाई करणे अपेक्षित असते असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तिशागर ढोले यांनी या प्रशिक्षणाचा उद्देश सांगून आषाढी वारी मध्ये घटना प्रतिसाद प्रणालीचे महत्त्व सांगितले तसेच गर्दीचे व्यवस्थापन करताना या प्रशिक्षणातून खूप काही सर्वांना समजेल असेही त्यांनी सांगितले.

## जिल्हा नियोजन समितीच्या १८ सदस्यांच्या निवडी रखडल्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा नियोजन समितीत १८ सदस्यांची जागा रिक्त आहेत. या निवडी रखडल्याने महायुतीतील कार्यकर्त्यांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. मागील पाच वर्षात अडीच वर्ष महाविकास आघाडी आणि नंतरचे अडीच वर्ष महायुतीचे शासन आले. नुकतेच सात महिन्यांपूर्वी पुन्हा महायुती सत्तेवर आली. नेत्यांना मंत्रीपदे, आमदारकी मिळाली. परंतु, कार्यकर्ते पदाच्या प्रतिक्षेत आहेत.

जिल्हा नियोजन समितीच्या निमंत्रित तसेच विशेष निमंत्रित सदस्यांच्या एकूण १८ जागा रिक्त आहेत. डिपीसीवर आपली वर्णी लागावी, यासाठी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये रस्सीखेच सुरू असून भाजप, शिंदे सेना तसेच अजित पवार गटाला नेमक्या किती जागा मिळतील, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पालकमंत्री होऊन सहा महिने होत असल्याने सदस्यांच्या नावाची शिफारस केलेली नाही.

१४ निमंत्रित सदस्य तसेच ४ विशेष निमंत्रित सदस्य अशा एकूण १८ जागा रिक्त आहेत. ३० जानेवारी नंतर जून महिन्यात डिपीसीसी बैठक झाली. आता पुढील बैठकीसाठी आणखी तीन महिन्यांचा अवकाश आहे. तोपर्यंत निवडी जाहीर होतील की पुन्हा प्रतिक्षा करावी लागणार याबाबत कार्यकर्त्यांत चलबिचल सुरु आहे.

इच्छुक आतापासून फिल्डिंग लावून दमले आहेत. भाजपातील गटबाजी, शिंदे सेनेतील आयारामांची वाढती संख्या, अजित पवार गटातील मातब्बर नेत्यांची संख्या अधिक असल्याने यातून कोणाची वर्णी लागणार याबाबत गॉडफादरमार्फत लॉबिंग करत आहेत. भाजप, शिवसेना शिंदे गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाकडून संबंधितांची नावे जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांकडे येतील. यावर पालकमंत्री चर्चा करून ही नावे मुख्यमंत्र्यांकडे पाठवितात. परंतु अद्याप प्रक्रीयाच सुरु झालेली नाही.

**शिंदे सेनेत इनकमिंग अधिक**

अक्कलकोटमधून माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, पंढरपूर-मंगळवेढामधून भगीरथ भालके, करमाळ्यातून जयवंतराव जगताप, दक्षिण सोलापूरमधून अमर पाटील यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत. तर राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते बळीराम काका साठे ही शिंदे सेनेच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. त्यामुळे डिपीसी सदस्य नियुक्तीत महायुतीतील तिन्ही घटक पक्षांच्या नेत्यांनी चांगलीच कसरत करावी लागणार आहे.

## संपादकीय

# स्पायडर वेब हल्ला

रशियाने युक्रेनची राजधानी किव्हवर रात्रीच्यावेळी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला. या अगोदर युक्रेनने रशियावर ड्रोन हल्ला केला होता. कमी किमतींचे; पण अत्याधुनिक ड्रोन उच्चस्तरीय प्रणालीलाही आव्हान देऊ शकतात, हे विशेष. युक्रेनने 'ऑपरेशन स्पायडर वेब' म्हणजेच ड्रोनचा एक थवा रशियाच्या पाच लष्करी हवाई तळांवर सोडला होता, ज्यामध्ये 41 बॉम्बर विमाने आगीत जळून भस्मसात झाली. रशियाचे या हल्ल्यात 7 अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले होते. युक्रेनने रशियाच्या हवाई तळांवर ड्रोनने हल्ला केला. ऑपरेशनचे नियोजन 18 महिन्यांपूर्वी सुरू झाले होते. युक्रेनने हल्ल्यामध्ये रशियाच्या मुर्मन्स्क, इर्कुत्स्क, इवानोवो, रियाझान आणि अमूर प्रदेशातील पाच हवाई तळांवर एफपीव्ही ड्रोनने हल्ले केले.

**हल्ले का रोखता आले नाहीत?**

रशियाच्या हद्दीतून कमी उंचीवर, जवळून प्रक्षेपण : ट्रकमध्ये बसवलेल्या, लपविलेल्या कंटेनर्समधून, अनेक ड्रोन रशियाच्या हद्दीतूनच प्रक्षेपित करण्यात आले. ते अत्यंत कमी उंचीवर उडत होते, ज्यामुळे एस-400 सारख्या लांब पल्ल्याच्या प्रणालींच्या रडार नजरेच्या/शोध क्षमतेच्या खाली होते. एस-400 प्रामुख्याने जास्त उंचीवर उडणाया, लांब अंतरावरील विमाने आणि क्षेपणास्त्रांसारख्या धोक्यांसाठी डिझाइन केलेले आहे. स्वतःच्या संरक्षण परिघा मागून येणाया कमी उंचीवरील धोक्यांसाठी नाही.

गुप्तचर यंत्रणेचे अपयश : मुख्य अपयश एस-400 प्रणालीमध्ये नसून रशियन गुप्तचर यंत्रणेमध्ये होते. युक्रेन एक वर्षापासून या ऑपरेशनची योजना करत होता आणि ड्रोन रशियामध्ये पोहोचवत होता. तरीही रशियन एजन्सीजला हा महत्त्वपूर्ण धोका वेळेवर शोधण्यात अपयश आले.

स्वार्म हल्ले आणि बचाव यंत्रणेवर ताण : एकाच वेळी मोठ्या संख्येने ड्रोन प्रक्षेपित करण्यात आले, ज्यामुळे स्थानिक बचाव यंत्रणांवर ताण आला. एस-400 शक्तिशाली असले तरी, जर ड्रोन लहान असतील आणि खूप कमी उंचीवर उडत असतील तर समन्वित स्वार्म हल्ला अगदी प्रगत प्रणालीलाही (एस 400) आव्हान देऊ शकतो.

तैनातीतील त्रुटी आणि एअर डिफेन्सचा अभाव : काही प्रकरणांमध्ये, एस-400 ला कमी पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालींच्या (जसे की पँत्सिर किंवा टॉर) पुरेशा समर्थनाशिवाय एकाकीपणे तैनात केले गेले होते, ज्या कमी उंचीवरील ड्रोनचा सामना करण्यासाठी अधिक योग्य आहेत. एस-400 हे मोठ्या हवाई संरक्षण नेटवर्कचा फक्त एक थर आहे. कमी पल्ल्याच्या प्रणालींशी (जसे की पँत्सिर-एस1 किंवा टॉर-एम2) योग्य एकत्रीकरणाशिवाय, ती काम करू शकत नाही.

एस-400 युनिट्सना लक्ष्य करणेः युक्रेनने एस-400 प्रणालींनाच नष्ट करण्यासाठी रणनीती वापरली गेली, क्षेपणास्त्र हल्ले करण्यापूर्वी रडार आणि अँटेनांना लक्ष्य करण्यासाठी अनेक ड्रोनचा वापर केला गेला ज्यामुळे मुख्य हल्ला होण्याआधी रक्षण रडारप्रणाली नष्ट झाली.

बचाव यंत्रणेवर ताण : स्पायडर वेब हे अनेक दिशांनी ड्रोन, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि डिकॉय वापरून बहु-वेक्टर, स्वार्म-शैलीतील हल्ला करते. एस-400 सारख्या प्रगत प्रणालींमध्येही ड्रोन, क्रूझ क्षेपणास्त्रे संख्या आणि एकाच वेळी लक्ष्य करण्याची क्षमता मर्यादित असते. मोठ्या प्रमाणावर स्वार्म हल्ला रडार आणि फायर-कंट्रोल प्रणालींवर ताण आणतो. एकदा ताण आल्यानंतर, ड्रोनसारखी कमी किमतीची लक्ष्ये संरक्षणातील फटींमधून आत येऊ शकतात.

एस-400 : ही प्रणाली फायटर जेट्स, A एडब्ल्यूएसीएस, बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि उच्च-गती क्रूझ क्षेपणास्त्रांचा सामना करण्यासाठी अनुकूल आहे. स्वस्त, लहान एफपीए ड्रोन, लोइटरिंग दारूगोळा किंवा डिकॉय स्वार्मसाठी नाही. युक्रेन मोठ्या संख्येने कमी किमतीचे, व्यावसायिक सुधारित ड्रोन वापरत आहे, जे लाखो डॉलर्सच्या इंटरसेप्टरचा वापर नाकाम करत आहे.

इलेक्ट्रॉनिक युद्ध व स्टील्थ रणनीती : युक्रेनने आपली इलेक्ट्रॉनिक युद्ध आणि जॅमिंग क्षमता सुधारली आहे, जी काहीवेळा रडार किंवा ट्रॅकिंग प्रणाली गोंधळात टाकत आहे. काही ड्रोनमध्ये कमी रडार क्रॉस-सेक्शन्स असतात आणि ते हळू उडतात, ज्यामुळे लांब पल्ल्याच्या रडारमधून ते दिसत नाही.

**युद्धाची परिभाषा बदलली**

स्पायडर वेब हल्ले पारंपरिक युद्धाची परिभाषा बदलत आहे. शतकानुशतके, पारंपरिक युद्ध मोठ्या सैन्ये, रणगाडे, विमाने आणि नौदलांच्या थेट संघषाभीवती फिरत होते. तथापि, ड्रोन तंत्रज्ञान, सायबर युद्ध आणि माहिती ऑपरेशन्सच्या वाढीमुळे रणांगण रणनीती बदलत आहे.

ड्रोन कमी शक्तिशाली घटकांना अधिक तांत्रिकदृष्ट्या प्रगत विरोधकांना महत्त्वपूर्ण नुकसान पोहोचवण्यासाठी एक किफायतशीर मार्ग आहे. तुलनेने स्वस्त ड्रोन अनेक दशलक्ष डॉलर्सच्या विमानाला नष्ट किंवा नुकसान करू शकते. स्पायडर वेब हल्ले अनपेक्षित ठिकाणांहून, कधीकधी देशाच्या हद्दीच्या आत सुरू होऊ शकतात.

**गुप्तचरचे महत्त्व**

स्पायडर वेबसारख्या ऑपरेशन्सचे यश गुप्त माहिती गोळा करणे, घुसखोरी करणे आणि दीर्घकाळ न पकडता काम करण्याची क्षमता यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. यामुळे केवळ सामरिक मारक क्षमतेतून यश मिळत नाही. हा बदल अधिक अपारंपरिक, तंत्रज्ञान-आधारित संघर्षाकडे वाटचाल दर्शवतो जिथे चपळता, गुप्तचर पारंपरिक लष्करी सामर्थ्याइतकीच महत्त्वाची भूमिका बजावतात.

**भारताकरता सावधानतेचा इशारा?**

अशा प्रकारचा हल्ला सर्व देशांसाठी एक मोठा इशारा आहे. ऑपरेशन स्पायडर वेबमधील धडे भारताकरता पण आहेत. कोणताही देश अत्याधुनिक ड्रोन हल्ल्यांच्या धोक्यापासून सुरक्षित नाही. केवळ पारंपरिक, लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणालींवर अवलंबून राहणे आता पुरेसे नाही. देशांना सर्वसमावेशक, बहु-स्तरित संरक्षण रणनीती विकसित करण्याची आवश्यकता आहे, ज्यात काउंटर-ड्रोन तंत्रज्ञान, कमी पल्ल्याचे हवाई संरक्षण, इलेक्ट्रॉनिक युद्ध क्षमता आणि गुप्तचर नेटवर्क समाविष्ट आहेत.

राष्ट्रीय सीमांच्या आत हल्ले होण्याची शक्यता वाढल्याने, वाढीव अंतर्गत सुरक्षा उपाययोजना आणि गुप्त ऑपरेशन्सविरुद्ध सतर्कता आवश्यक आहे. जॅमर, लेझर प्रणाली आणि अगदी विशेष इंटरसेप्टर ड्रोनसह प्रभावी काउंटर-ड्रोन उपाययोजनांमध्ये संशोधन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. स्पायडर वेब ऑपरेशन अधोरेखित करते की भविष्यातील युद्धात पारंपरिक आणि अपारंपरिक पद्धतींचे मिश्रण असण्याची शक्यता आहे. ज्यामुळे सर्व राष्ट्रांना जटिल आणि अनपेक्षित धोक्यांच्या नवीन युगासाठी तयारी करणे आवश्यक आहे.

## प्रबोधन

# भाग्यवाद

अठराव्या शतकाच्या प्रारंभापासून उत्तरकाळापर्यंत फ्रान्समध्ये सरंजामदारी अन्याय आणि शोषण यांनी शेवटची मयार्दा गाठली होती. अत्याचारांची परिसीमा झाली होती. जनता अन्न अन्न म्हणून आक्रोश करीत होती आणि राज्यकर्ते असलेले १६ व्या लुईचे घराणे, त्याचे सरदार, सरंजामदार, अधिकारी सत्ता आणि संपत्तीने मदांध झाले होते. राजाला प्रजेची स्थितीच माहीत नव्हती, तर त्याला त्यांची दया कशी येणार? शेवटी राजवाड्यावर जनता मोच्यार्ने गेली. रिकामी भांडी आणि थाळ्या पिटून जनता ओरडू लागली, 'महाराज, आम्हाला भाकरी द्या! महाराणी, आम्हाला भाकरी द्या!' राजवाड्याच्या शांततेचा भंग होऊ लागला. महाराणी आरामगृहाच्या गच्चीवर आल्या. 'भाकरी द्या! भाकरी द्या! महाराणी, आम्हाला भाकरी द्या!' गोंगाट, कोलाहल वाढला. महाराणीसुद्धा ऐषआरामाने धुंद झालेल्याच होत्या. त्यांना लोक काय म्हणताहेत ते कळेना. त्यांनी सेवकांना विचारलं, 'हे लोक काय म्हणतात?' सेवक म्हणाला, 'ते भाकरी द्या म्हणतात!' ते ऐकून बाईसाहेब हसू लागल्या. हसत हसत त्या म्हणत होत्या, 'काय मूर्ख आहेत हे लोक! अरे, भाकरी नसेल तर फळं, पुलाव, केक खाता येत नाही? हाऽहाऽ.

या गोष्टीची आठवण वारंवार व्हावी, असा काळ आपल्या देशात स्वातंत्र्यानंतर पन्नासवर्षातच आला आहे. फ्रान्सच्या राणी आणि राजाच्या जागी आपले सरकारी नोकर आणि आमदार-खासदार आहेत, एवढाच फरक ! आजच्या राज्यकर्त्यांकडे पाहिल्यावर हे गांधी-नेहरू-इंदिरा-लाल बहादुर यांचे वारसदार आहेत, असं म्हणायला मन धजावत नाही. 'दरिद्री नारायणाचे स्मरण' हा गांधीजींचा ध्यास होता. 'साम्यवादी विचार' हा नेहरूंचा श्वास होता आणि 'गरिबी हटाओ' ही शास्त्री- इंदिराजी यांची आस होती. आजच्या राजकारण्यांचा ध्यास आहे, मंत्री-मुख्यमंत्रीपद किंवा प्रधानमंत्रीपद! भ्रष्टाचाराच्या गंगेत हात धुवून घेणं हा लोकप्रतिनिधी आणि नोकरशहांचा श्वास आहे; चंगळवाद ही यांची आस आहे. फ्रान्समधील अन्यायाने, शोषणाने क्रांती झाली. आपल्या इथे मात्र कशानेही क्रांती होणार नाही, अशी गचाळ स्थिती आहे.

आपण भारतीय भाग्यवादी आहोत, त्यामुळे इथे लबाडांचं फार फावतं. बरे झाले, नशीब! वाईट झाले, नशीब! काही झाले नाही, तरीही नशीब! अशा दैववादी, भाग्यवादी, नशीबवादी वृत्तीमुळे एक प्रकारची कमालीची उदासीनता येते. परिस्थितीत बदल झाला पाहिजे हे प्रत्येकाला कळतं; पण तो बदल कोणी करायचा? तो बदल ईश्वरच करणार! कारण कर्ताकरविता केवळ ईश्वरच ना! ह्या ईश्वरशरण्यबुद्धीने भारताचं अपरिमित नुकसान झालं आहे. जे घडतं ते त्याची इच्छा म्हणून घडतं. त्याच्या व्यवस्थेत आम्ही कळसूत्री बाहुल्यांनी गोंधळ घालायचा नाहीच. हे षंढ तत्त्वज्ञान आमच्या दुर्दशेचे दशावतार घडवतं. म्हणूनच आमच्या इथे क्रांतीचा भडका दूर राहो; साधी ठिणगीही पडत नाही.

वास्तविक आज स्वातंत्र्योत्तर कालखंडातील तिसऱ्या पिढीच्या हाती राजकारण आहे. पण कसे आहेत हे नवे नेते ? ते खूप श्रीमंत, खूप मग्रूर, खूप मस्तवाल, खूप बेपर्वा, अगदी १६ व्या लुईसारखे किंवा त्याच्या राणीसारखे आहेत. जनतेचं दर्शनही त्यांना ओकारी आणतं. स्वतःच्या कोषात गुरफटून चंगळवादी जीवन जगणं, सत्ता-संपत्तीचा अनिर्बंध उपभोग घेणं, हा त्यांचा जीवनक्रम आहे. म्हणूनच अशा लक्ष्मीपुत्रांना निवडणुका लढवण्यास प्रतिबंध झाला पाहिजे. त्यासाठी राज्यपद्धतीत आमूलाग्र बदल आवश्यक आहेत; ब्रिटिश राज्यपद्धती आपणाला चालणार नाही.

गो. ब. देवल यांच्या 'शारदा' नाटकात श्रीमंत भुजंगनाथ हे अजाण शारदेशी विवाह करू इच्छितात. त्याचं वय किती? नाटककाराने अवघे पाऊणशे वयमान असं पद लिहून भुजंगनाथाचा उपहास केला आहे. आमचे बरेच राजकारणी पाऊणशे वयमान उलटल्यावरही कण्हत, कुंथत, लंगडत, खोकत राज्यकर्ते म्हणून मिरवीत असतात. वयाच्या ७५ वर्षानंतर त्यांना उमेदवारी अर्ज भरता येणार नाही, असा कायदा हवा. शरीर विकलांग झालं की मन मुर्दाड होतं. मन मेलं की दृष्टी मरते, विवेकहीनता येते. महाभारतातील द्रौपदीचं वस्त्रहरण पाहाणारे भीष्माचार्य हे बहिष्कारयोग्य व निंदनीय आहेत. 'समदृष्टी' अध्यात्मात ठीक असेल, पण समाजकारणात ती विषमतेला जन्म देते. एवढं इथे कळलं, तरी खूप झालं. तेव्हा-

तळागाळातील । राज्यकर्ता हवा
जाणिवेचा हवा । स्पर्श त्यास ॥१
दारिद्र्याचा अर्थ । उपासाचा अर्थ
शोषणाचा अर्थ । कळे त्यास ॥२
बुद्धीचा तल्लख । मनाचा मृदुल
वेदनेशी नाळ हवी त्याची ॥३
मांडीवरी घेई । शिणलेला माथा
तोच व्हावा नेता । शोषितांचा ॥४
ज्याच्या दृष्टीतून । सुटेना शोषण
तोच नेता जाण। नव्या युगी ॥५
ओठातील घास। देतो भुकेल्यास
धन्य त्याचा वंश । उपकारी ॥६
जनांच्या दुःखाचे। गाठोडे घे शिरी
पाय ठेवी दारी। भविष्याच्या ॥७
मुर्दाड, मग्रूर। बुद्धिभ्रष्ट नेता
खंतवितो चित्ता । पाहताच ॥८
नेता असा हवा । धीट-स्वार्थ त्यागी
लोका देवाजागी। पूजी जो का ॥९
अशा नेतृत्वाची । देशाला या आस
अन्यथा उदास। राष्ट्रधर्म ॥ १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# शहाण्यांनी घ्यावी । काळजी देहाची

'कानामागून आली आणि तिखट झाली' ह्या मराठीमधील म्हणीचा अर्थ स्पष्ट करणारं उदाहरण द्यायचं तर, ज्या काळात फॅमिली डॉक्टर हा शब्द रूढ होता, तेव्हा फॅमिली रूम, फॅमिली पॅक, फॅमिली मिक्स्चर, फॅमिली टूर हे शब्द त्या मानाने पॉप्युलर नव्हते. आज हे शब्द आघाडीवर आणि फॅमिली डॉक्टर हा शब्द मात्र मागे पडलेला दिसतो आहे. पूर्वीचा फॅमिली डॉक्टर सर्व रोगांवर इलाज करीत असे. कोणताही रोग गंभीर होणार नाही, याची काळजी घेत असे. त्यामुळे वैद्य अर्थात डॉक्टर हा यमराजाचा सख्खा भाऊ असतो, हे संस्कृत सुभाषित माहीत असूनही लोक आपल्या कौटुंबिक डॉक्टरकडे मोठ्या विश्वासाने जात असत. घाबरट रुग्ण तर डॉक्टर तुम्ही मला वाचवलंत, तुम्ही माझ्यासाठी देव आहात, असं म्हणून सद्गदीत व्हायचे.

पण आज फॅमिली डॉक्टर ही सामाजिक जिव्हाळ्याची व्यक्ती नव्हे; संस्था कालबाह्य झाल्यामुळे डॉक्टर हे समाजाचे मित्र की शत्रू असा प्रश्न विचारण्याइतकी या व्यवसायाची नीतिमत्ता खालावली आहे. पूर्वीही सामान्य डॉक्टर (General Practitioner) होते. आजही त्यांची संख्या कमी नाही, पण वैद्यक व्यवसायाचं विशेषीकरण (Specialization) झाल्यामुळे सामान्य डॉक्टर अतिसामान्य झाले असल्यास नवल नाही. पण त्यामुळे आपण एक संरक्षक कवच गमावलं आहे, हे लक्षात घ्यायला हवं. हे कवच आपणाला 'रोग बरा करण्यापेक्षा रोगाचा प्रतिबंध चांगला असतो.' (Prevention is better than cure) हे आरोग्यशास्त्राचं मूलतत्त्व शिकवत होतं. आज रुग्ण ज्या परिस्थितीशी झगडताहेत, त्या परिस्थितीचं ध्येय 'Malpractise is profitable than cure' अर्थात, रोग विकोपाला न्या आणि फायद्यात रहा हेच असल्याने गरीब देशातील लाचार लोक रोगाने काही अंशी; तर फायद्यासाठी डॉक्टरांनी केलेल्या अयोग्य हाताळणीमुळे बहुतांशी मृत्यूच्या दाढेत तर जातातच, पण त्याआधी निष्कांचन झाल्यामुळे दारिद्र्याहून मरण बरे असं म्हणून मृत्यूला आनंदाने मिठी मारत असतील. म्हणूनच रोग आणि त्याच्या अनुषंगाने येणारं दारिद्र्य या दोन्ही संकटांपासून मुक्त होण्याचा एकमेव इलाज फॅमिली डॉक्टर हेच आहेत. पण आज फॅमिली डॉक्टरशी आपले संबंध जसे 'कारणापुरते' अर्थात कामापुरता मामा असे आहेत. ते खूप सुधारून फॅमिली डॉक्टरांना भाच्यांची काळजी घेणाऱ्या मामाच्या भूमिकेत नेण्याचं काम आपण केलं पाहिजे. मामा-भाचे, काका-पुतण्या, असे प्रेमाचे संबंध द्रव्येन सर्वे वशः अशा व्यवहारवादी तत्त्वात बसवून चालणार नाहीत. द्रव्याचे वशीकरण जुजबी आणि जिव्हाळ्याचे वशीकरण घनिष्ट ठेवल्यास अवघड कामं सोपी होणार आहेत.

फॅमिली डॉक्टरशी आपले संबंध प्रेम, आदर, जिव्हाळयुक्त होण्यासाठी त्यांना वेळोवेळी सदिच्छा भेट देणं, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे सुख-दुःखाचे क्षण स्वतःच्या उपस्थितीने पार पाडणं, त्यांच्या कौटुंबिक अडचणींचा भार आपणावर घेणं, असं आपण करू शकतो. त्यांच्या खास ज्ञानाचा समाजाला उपयोग व्हावा म्हणून आपल्या परिचितांना त्यांच्याकडे आपण स्वतः नेणं किंवा आपला संदर्भ देण्याचा आग्रह करून पाठवणं. रिकामपणाची कामगिरी म्हणून अशा डॉक्टरांना भेटून काही माज्यायोग्य काम आहे का? अशी विचारणा जरी आपण केली, तरी आपणा दोघांतील परकेपणा दूर होऊ शकतो. परिणामी, डॉक्टर-पेशंट नात्याला पूर्णविराम मिळू शकतो. फॅमिली डॉक्टर मग तुमचे उत्कृष्ट सल्लागार, उत्तम काळजी घेणारी व्यक्ती अशी भूमिका बजावतील आणि आपल्या आरोग्यविषयक लहान-मोठ्या तक्रारींवर साधे, सोपे, बिनखर्चिक, बिनधोक इलाज करतील.

रोगनिदान आणि औषधयोजना ही कामे सर्वच डॉक्टर करतात. पण आरोग्यविषयक जाणीव जागृती मात्र एखाद्या कुटुंबाशी समरस झालेला डॉक्टरच करू शकतो. आपल्या कुटुंबातील एखाद्याला क्षयरोग झाल्याचं निदान झाल्यावर अशा व्यक्तीची स्वतंत्र खोलीत व्यवस्था करा, त्या व्यक्तीची सेवा करताना, अन्न, पाणी, औषध देताना नाक व तोंड कळव प्रमाणे कापडी पट्टीने आच्छादण्याची सूचना धंदेवाईक डॉक्टर देऊच शकत नाहीत. पण एक जिव्हाळ्याचा मित्र म्हणून आपला डॉक्टर एक शास्त्रीय सत्य सांगेल की, टी. बी.चे जंतू एकदा शरीरात घुसले, की ते कशानेही मरत नाहीत. शरीरात दबा धरून बसतात आणि शरीर अशक्त झालं की, ते बळावून सेवा करणाऱ्या गाफील माणसाचा बळी घेतात. लहान मुलं, म्हातारी माणसं, आजारी लोक यांना तर संसर्ग फार लवकर बाधतो. हे शास्त्रीय ज्ञान अधिकाराने आणि आपुलकीपोटी केलं जाऊ शकतं आणि ते उपकारकही ठरतं. पित्ताशय किंवा मूत्रमार्गातील खडे शस्त्रक्रियेने काढावेत, तर हजारो रुपये खर्च होतात. पण काही औषधं आणि पथ्य यांनी हा विकार अल्प खर्चात बरा करणं, फॅमिली डॉक्टरना अवघड नाही. समाजस्वास्थ्य खालावत असलेल्या आजच्या परिस्थितीत मानवतावादाचा अवलंब कल्याणकारक होण्यासाठी आपण सारे प्रयत्नशील राहू या आणि निरामय जीवन जगू या! तेव्हा-

शहाण्यांनी घ्यावी । काळजी देहाची
सुखी जीवनाची। तीच किल्ली ॥१
निरोगी माणसा । सर्व सुखलाभ
आरोग्यात कोंब। चैतन्याचा ॥२
रोगनिवारण। प्राधान्याचे काम
धर्म-अर्थ-काम। साध्य करी ॥ ३
आरोग्यरक्षक। हवा चिकित्सक
मैत्री संजीवक । करा त्याची ॥४
रूक्ष व्यवहारा। पलीकडे जावे
प्रेमाने जिंकावे। डॉक्टरासि ॥५
जीवनाची निंदा। मूर्खचि करतो
देहा वागवितो। तुच्छतेने ॥६
अशा विरक्तांना । दुरून वंदावे
काही न ऐकावे । कधी त्यांचे ॥७
पुन्हा नाही जन्म। पक्के समजून
सुखाने जीवन । खर्च करा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# युवकांनो कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवा...

आजकालचे युवक आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेले आहेत. आणि नको त्या फालतू छंदात वेळ वाया घालवत आहेत. त्यांना स्वतःच्या कर्तव्याची जान आणि जबाबदारीचे भान जराही राहिले नाही. आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहेत? आणि आपण सध्या काय करत आहोत? याचा त्यांना विसर पडला आहे. म्हणूनच ते आपले कर्तव्य आणि जबाबदारी विसरून नको त्या दिशेला भरकटत जात आहेत. आणि स्वतःच्या पायावर स्वतःच्या हाताने धोंडा मारून घेत आहेत. आपल्याच हाताने आपलेच जीवन बरबाद करून घेत आहेत. वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढत आहेत. दारू, सिगारेट व गांजा या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेत आहेत.आणि स्वतःच्या हाताने मृत्यूला जवळ करत आहेत. व्यसनी तरुणांचा देश ही भारताची नवी ओळख जगासमोर आली आहे. आपल्या भारतात मिसरूड न फुटलेले अगदी पाच ते सहा वर्षाची मुले देखील व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. मग या नादात हे युवक कशाला कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवतील. शिक्षणाच्या नावाखाली आपल्या वडिलांकडून भरपूर पैसा मागवत आहेत आणि तो पैसा शिक्षणाला न लावता ढाब्यावर जाऊन मौज मजा करण्यात लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून मवाली पोरांसोबत टवाळक्या करत फिरत आहेत. वाईट व्यसनाने नुसते बरबटून गेले आहेत. खरे तर युवकांनी तरुणपणात खूप खूप शिक्षण शिकून आपले जीवन ध्येय गाठायला हवे.शिक्षणाच्या जोरावर एखादी नोकरी काबीज करायला हवी.आई-वडिलांचे, गावकऱ्यांचे व समाज बांधवांचे स्वप्न साकार करायला हवे. नंतर सामाजिक बांधिलकी म्हणून किंवा सामाजिक कर्तव्य व जबाबदारी म्हणून युवकांनी स्वतः शिक्षित होऊन इतरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे, जेणेकरून ते युवक शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला प्रगतीपथावर नेऊ शकतील. त्याचबरोबर युवकांनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून पर्यावरणाची जिवापाड काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे काम आहे. त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची सुरक्षा करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. युवकांनी समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारायला हवा. आणि समाजातील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करायला हवेत. युवकांनी आपल्या कला आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी व देशासाठी करावा. युवकांनी एक जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या विकासात सक्रियपणे सहभाग नोंदवावा. युवकांनी समाजाला दिशा देण्यासाठी उत्तम नेतृत्वाची भूमिका पार पाडावी. तसेच नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि समाजाला प्रेरित करावे.गोरगरीब, वंचित, उपेक्षित व तळागाळातील युवकांच्या शिक्षणाला थोडाफार हातभार लावावा. त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी. आणि त्यांना सुद्धा आपल्या बरोबरीला आणून त्यांच्या जीवनात आनंदाची व चैतन्याची मंगलमय पहाट आणावी. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा. अनाथांना व वृद्धांना आश्रमात जाऊन कपडे, भेटवस्तू व अन्नदान वाटप करावे. आपल्या आई वडिलांना सुखाचे व आनंदाचे क्षण दाखवावेत. त्यांना कष्टाची कामे करू देऊ नयेत. त्यांना खूप खूप जीव लावावा. विशेष करून उतारवयात त्यांची अधिक काळजी घ्यावी. त्यांना वेळेवर जेवण द्यावे आणि त्यांचा वेळेवर दवाखाना करावा.पत्नीचे ऐकून त्यांना अंतर देऊ नये. त्यांची हेळसांड करू नये. नाहीतर आजकाल शिकून नोकरीला लागलेले काही महाभाग पत्नीचे ऐकून आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. त्यांना घाण घाण शिव्या देऊन घराबाहेर काढत आहेत.हे आपण सर्वजण डोळ्यांनी पाहत आहोत. म्हणून युवकांनो आपल्याला कळकळीची नम्र विनंती आहे की, आपण आई-वडिलांसोबत असे अमानुष प्रकार न करता, त्यांना गद्दार न होता आणि त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता न दाखवता त्यांना खूप खूप जीव लावूया, त्यांना अगदी आनंदात व मजेत ठेवून त्यांना सुखाचे दिवस दाखवूया कारण आई-वडिलांनी आपल्यासाठी खूप खूप खस्ता खाऊन व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला उच्च शिक्षण शिकवलेले असते. त्यांच्या जीवावरच तर आपला उच्च शिक्षणाचा डोलारा उभा असतो. हे आपण कधीच विसरता कामा नये. त्यांनी आपल्याला खूप खूप कष्ट करून आपल्या शिक्षणाला पैसा लावलेला असतो. आपण नोकरीला लागेपर्यंत त्यांना एकदिवस सुध्दा सुखाची झोप लागत नसते. मग आपण नोकरीला लागल्यावर आई-वडिलांना सुखात ठेवणे व म्हातारपणात त्यांचे योग्य पालन पोषण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी असते. हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवायला हवे. पण आजकाल कोण लक्षात घेतो? आजकाल नोकरीला लागलेले युवक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी विसरून, आई-वडिलांना गावी ठेवून नोकरीच्या ठिकाणी स्थायिक होतात आणि तिकडेच पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. तिकडच्याच दुनियेत बायको लेकरांसोबत रममान होतात. समाज बांधवांना व आई-वडिलांना मदत करायची असते हे विसरून जातात. नेमके हेच डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित नव्हते. डॉ. बाबासाहेब म्हणायचे की, लावलेला एक दिवा हजारो दिव्यांना प्रज्वलित करू शकतो. म्हणजे एक नोकरीला लागलेला समाज बांधव आपल्या हजारो बांधवांना आपल्या बरोबरीला आणू शकतो पण आजकालच्या लोकांची मानसिकता फार गढूळ झाली आहे. त्यांना वाटत आहे की, माज्यासारखा उच्चपदस्थ अधिकारी दुसरा कोणीच होऊ नये, समाजात मलाच अधिक मान मिळावा, मीच भरपूर पैसा व संपत्ती कमवावी आणि इतरांनी फक्त माज्याकडे बघत राहावे. साहेब, साहेब करत माज्या मागे पुढे फिरावे.असे आजकालच्या नोकरदारांना वाटत असते. म्हणजे आजकालचे नोकरदार स्वार्थी व मतलबी झाले आहेत. त्यांना फक्त आपलेच भले व्हावे वाटत आहे. आणि इतरांचे वाटोळे व्हावे वाटत आहे. आपल्या महापुरुषांनी जर स्वतःचा स्वार्थ पाहिला असता तर ते आज खूप श्रीमंत झाले असते पण आज आपण कुठे असतो? कोणाच्या तरी दावणीलाच बांधलेले गुलाम असतो ना...याचा एकदा विचार करून बघा. आपले महामानव स्वतः शिकले, मोठे झाले आणि समाजालाही मोठे केले आणि आपल्यालाही खूप खूप शिकून मोठे व्हा आणि आपल्याबरोबर समाज बांधवांनाही मोठे करा असे सांगून गेले. मग माझा आजच्या नोकरदारांना प्रश्न आहे की, आपण नोकरीला लागल्यावर किती लोकांना आपल्या बरोबरीला आणले? किती समाज बांधवांचा उद्धार केला? महापुरुषांच्या नावाचा डंका आजही संपूर्ण जगभर गाजत आहे. हे केवळ त्यांनी केलेल्या कायार्मुळेच! हे आजच्या नोकरदार वगार्ने मनोमन ध्यानात ठेवून थोडा विचार करायला हवा. आज या महापुरुषांना जाऊन कित्येक वर्षे झाली आहेत, तरी देखील हे महामानव समस्त भारतीयांच्याच नव्हे तर अख्या जगाच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपण देखील स्वतःबरोबरच समाजाचा आणि देशाचा विचार केला तर नक्कीच आपण देखील मेल्यानंतर सुध्दा लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहाल.कारण बांधवांनो मेल्यावर आपल्याला काहीच सोबत घेऊन जायचे नाही, जसे रिकाम्या हाताने आलोय तसेच एकदिवस रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे... म्हणून जीवनात असे काहीतरी ऐतिहासिक व अलौकिक कार्य करा की, मेल्यानंतरही तुमचे नाव एक चांगला व्यक्ती म्हणून पंचक्रोशीत आदराने निघत राहील...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा
लातूर, मो.7498715661

# प्रांताधिकाऱ्याच्या नियुक्ती बाबत गणेश चिवटे यांचे पालकमंत्र्यांना निवेदन

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** माढा प्रांताधिकाऱ्याच्या नियुक्ती बाबत भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना निवेदन दिले आहे. गेली अनेक दिवसांपासून करमाळा कुडूर्वाडी विभागांमध्ये प्रांताधिकारी नियुक्त नसल्याची बाब गणेश चिवटे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निदर्शनास आणून दिली. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, करमाळा-कुडूर्वाडी विभागांमध्ये अनेक दिवसांपासून प्रांताधिकारी नियुक्त नाही.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनीही या मागणीची लागलीच दखल घेऊन लवकरच माढा उपविभागीय अधिकारी यांची नियुक्ती होईल असे सांगितले आहे, अशी माहिती गणेश चिवटे यांनी दिली आहे. करमाळा व माढा तालुक्यातील नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लागणारे शासकीय दाखले काढण्यासाठी विलंब होत आहे. शेतकरी व इतर नागरिकांना प्रांताधिकारी नसल्याने नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे गणेश चिवटे यांनी ही मागणी महत्वपूर्ण करून या विषयाला वाचा फोडल्याबद्दल नागरिकांमध्ये चिवटे यांचे कौतुक होत आहे.



## वात्रटिका

### इन कमिंग ची सुगी

तात्या, दादा, भाऊ कोणी
कोणीही या..दार आहे उघडे...
झाकून घेतोय, काळजी नको
कसेही या... अगदी नागडे...
बसायला सोडा,उभं राहिला
सुद्धा जागा उरली नाही...
जनांची नाही पण यांनी तर
मनाची पण धरली नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# चिंता मिटली; कुरनूर धरण शंभर टक्के भरले



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** कुरनूर धरणाच्या वरील बाजूच्या तुळजापूर तालुका व परिसरात मुसळधार पाऊस झाला आहे. तसेच धरणक्षेत्रात अनेक गावांमध्येही जोरदार पाऊस पडल्याने कुरनूर धरण यंदा शंभर टक्के भरले आहे. धरणाच्या तीन दरवाजांतून पाणी सोडण्यात सुरवात झाली आहे. धरण शंभर नटक्के भरल्याने पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याची समस्या दूर होणार आहे.

बोरी व हरणा नदीच्या संगमावर उभे असलेले कुरनूर धरण गेल्या आठवड्यात ५८ टक्के इतके भरले होते. दरम्यान, धरणाच्या वरच्या बाजूकडील धाराशिव जिल्ह्यातील नळदुर्ग व तुळजापूर भागात मोठा पाऊस रात्री पडला. तसेच कुरनूर, चपळगाव, हन्नूर आदी धरणग्रस्त भागातील अनेक गावांतही मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे दोन्ही नद्यांवाटे मोठ्या प्रमाणात धरणात पाणी आले आहे. गेल्या शुक्रवारी सकाळी धरण ८६ टक्के इतके भरले होते. सध्या हे धरण शंभर टक्के भरले आहे.

कुरनूर धरणाची एकूण क्षमता ८२२ दशलक्ष घनफूट इतकी आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर धरणाचे तीन दरवाजे उघडण्यात आले. सुमारे ४५० क्युसेकने धरणातून बोरी नदीत पाणी सोडण्यात येत आहे.

कुरनूर धरणातून सोडलेले पाणी आठ कोल्हापुरी बंधाऱ्यात जाणार आहे. मात्र, सर्व बंधाऱ्याची दार उघडण्यात आलेली आहेत. पावसाळ्याचे दिवस असल्याने कुठल्याही बंधाऱ्याचे दरवाजे बंद करण्यात आलेले नाहीत, घरण भरल्याने अक्कलकोट तालुक्यातील तीन नगरपालिका व अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

# आता 'आयटीआय'मध्ये सोलार अन इंटरनेटसह 'या' नव्या कोर्सचे धडे

## बेरोजगारी कमी होणार



लवकरच नवे कोर्स सुरू होतील सोलापुरातील शासकीय आयटीआय आणि बार्शी, पंढरपूर, सांगोला येथील आयटीआयमध्ये काही नवीन कोर्सच्या तुकड्या सुरू केल्या जाणार आहेत. काळाच्या ओघात विद्यार्थ्यांच्या आवडी व रोजगाराच्या संधी पाहून हा बदल करण्यात येत आहे. आगामी काळात या तुकड्या त्या आयटीआयमध्ये सुरू होतील.
– **सुरेश भालचिम,** जिल्हा व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सोलापूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील विजयपूर रोडवरील शासकीय आयटीआयसह जिल्ह्यातील सांगोला, बार्शी व पंढरपूर येथील आयटीआयमध्ये आता नवीन कोर्सच्या तुकड्या सुरू होणार आहेत. त्यातून १४० विद्यार्थ्यांना त्या नवीन अभ्यासक्रमांच्या माध्यमातून रोजगार व नोकरीच्या संधी उपलब्ध होणार आहेत. इयत्ता आठवी, दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी आयटीआयमध्ये स्वयंरोजगारासह नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध व्हावेत म्हणून नवनवीन कोर्स शिकविले जातात. पण, काळाच्या ओघात लोहारकाम, न्हावीकाम असे कोर्स बंद पडले. त्यामुळे अनेक आयटीआयला कुलूप लावावे लागले तर एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालये देखील बंद करावी लागली आहेत. सलग तीन वर्षे त्या कोर्सचे प्रवेश ५० टक्क्यांपेक्षा कमी राहिल्यावर ती तुकडी बंद केली जाते. विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण आवश्यक असून त्यातून बेरोजगारी कमी होण्यास मोठी मदत झाली आहे.

या पार्श्वभूमीवर आता सोलापूरच्या शासकीय आयटीआयमध्ये दोन नवीन कोर्सच्या तुकड्या सुरू केल्या जाणार आहेत. तर बार्शीच्या आयटीआयमध्ये एक आणि पंढरपूरच्या आयटीआयमध्ये दोन नवीन कोर्सच्या तुकड्या सुरू होणार आहेत.

तसेच सांगोल्यातील आयटीआयमध्ये इलेक्ट्रिशियन व फिटर या कोर्सची प्रत्येकी एक तुकडी सुरू केली जाणार आहे. दहावी-बारावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांचा कल आयटीआयकडे वाढला आहे, पण 'एमसीव्हीसी'साठी प्रवेश पुरेशा प्रमाणात होत नसल्याची स्थिती आहे. सोलापूर जिल्ह्यात १२ शासकीय तर २४ खासगी आयटीआय आहेत. सहा ठिकाणी 'एमसीव्हीसी'चा अभ्यासक्रम शिकवला जात असून त्याच्या ११ तुकड्या आहेत.

### चार आयटीआयमधील नवीन कोर्स

१. सोलापूर (विजयपूर रोड आयटीआय): इंटरनेट ऑफ हाय थिंग्ज (स्मार्ट सिटी) व सोलार टेक्निशियन (इलेक्ट्रिकल)
२. बार्शी : मॅकेनिकल ड्राफ्ट्समन
३. पंढरपूर : ड्राफ्ट्समन सिव्हिल आणि मशिनिस्ट
४. सांगोला : इलेक्ट्रिशियन व फिटर

# योग दिंडीच्या माध्यमातून नागरिकांना दिला नियमित योग करण्याचा संदेश

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारतीय योगाची माहिती व जाणीव जागृती व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाचे माहिती व प्रसारण मंत्रालय, केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर आणि योग दिवस समन्वय समिती, सोलापूर यांच्या सयुंक्त विद्यमाने आज



सकाळी ०७.०० वाजता ह.भ.प. आप्पाराव बचुटे उद्यान, दमाणी नगर, सोलापूर येथे योग दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे आणि सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव यांच्या हस्ते योग दिंडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. योग दिंडीची सुरुवात आप्पाराव बचुटे उद्यान येथून पावन गणपती- लक्ष्मी नगर- गंगा नगर-जगताप हॉस्पिटल-मरीआई चौक-सन सिटी रोड मार्गे परत येऊन आप्पाराव बचुटे उद्यान येथे समारोप करण्यात आला. दिंडीमध्ये योग समन्वयक मनमोहन भुतडा, दत्तात्रय चिवडशट्टी, रोहिणी उपळाईकर, जीवन कुमार आवताडे, जितेंद्र महामुनी, अशोक गरड, रघुनंदन भुतडा, सतीश घोडके, जे एम हन्नुरे आणि योग संस्थेचे पदाधिकारी, लहान मुले, युवक आणि नागरिक सहभागी झाले होते.

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

**नगर अभियंता कार्यालय - ग.व.सु. तांत्रिक** aeslumtechnical@gmail.com

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर नगर अभियंता कार्यालया- गवसू तांत्रिक विभागाकडून महानगरपालिका क्षेत्रात अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत सन २०२४- २५ मध्ये खालील कामाचे ई निविदा बाबत.

१. टेंडर आय डी २०२५_SMC_११८९८९२_१
२. टेंडर आय डी २०२५_SMC_११८९९१४_१
३. टेंडर आय डी २०२५_SMC_११८९९३९_१
४. टेंडर आय डी २०२५_SMC_११९०५५२_१

या कामाचे निविदा http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.१४/०६/२०२५ ते २४/०६/२०२५ पर्यंत भरणेस उपलब्ध आहे.

**सही/-**
**प्र.नगर अभियंता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

# 2025-26 अंतर्गत राष्ट्रीय खाद्य तेल बिया गोदाम बांधकामाकरीता अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान- तेलबिया या नवीन अभियानाला मंजूरी दिली आहे. यात समुह आधारित कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत सोयाबिन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापूर जिल्ह्याची निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्याकरीता 1 गोदाम बांधकाम ही बाब मंजूर आहे. या योजनेचा उद्देश गळीतधान्य उत्पादनाच्या सुरक्षित साठवणुक व मुल्य वृध्दी करणे.

पात्रता लाभार्थी- सरकारी, खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था, कंपनी (FPOS) आणि सहकारी संस्था या घटकांतर्गत मदतीसाठी श्उढ ला प्राधान्य देण्यात येईल. ज्या ठिकाणी गळीतधान्य पिके घेतली जातात तथापी गोदामाची व्यवस्था नाही अशा ठिकाणी गोदाम बांधकामासाठी ही बाब राबविण्यात येणार आहे. अभियानांतर्गत 250 मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या 50 टक्के किंवा रुपये 12.50 लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमणे अनुदान अनुज्ञेय राहील.

सदर बाब बँक कजार्शी निगडीत असून इच्छुक अर्जदार संस्थेने केंद्र शासनाच्या SMART वखार महामंडळ यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करणे आवश्यक आहे. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतरच संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास पात्र राहील. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# क्रीडा प्रबोधीनीत सरळ प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचणीद्वारे प्रवेश प्रक्रिया

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ सेवा प्रवेश व खेळनिहाय कौशल्य प्रवेशाकरिता विभागस्तर व राज्यस्तरावर चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी सहभागी होण्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक 23 जून 2025 रोजी पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे सादर करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याकरिता प्रतिभावंत खेळाडूंची निवड करून शास्त्रोक्त प्रशिक्षण, अद्ययावत क्रीडा सुविधा, शिक्षण, भोजन, निवास इत्यादी सुविधा क्रीडा प्रबोधिनीच्या अंतर्गत खेळाडूंना देण्यात येत आहेत. राज्यातील क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ सेवा प्रवेश व खेळनिहाय कौशल्य चाचण्यांमध्ये निवासी व अनिवासी खेळाडूंना प्रवेश देण्यात येणार आहे. यासाठी ज्युदो, जिम्नॅस्टिक, सायकलिंग, फुटबॉल,जलतरण, हॅन्डबॉल इत्यादी खेळांच्या खेळनिहाय चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे.

क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ सेवा प्रवेश प्रक्रिया व खेळनिहाय कौशल्य चाचणी याबाबत अर्हता पुढीलप्रमाणे-

सरळ प्रवेश प्रक्रिया- क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले खेळाडू ज्यांचे वय 19 वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाबाबतची चाचणी तज्ञ समिती समक्ष देऊन प्रवेश निश्चित केला जातो.

खेळनिहाय कौशल्य चाचणी- क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंना ज्यांचे वय 19 वर्ष आतील आहे अशा खेळाडूंना संबंधित खेळाच्या खेळनिहाय कौशल्य चाचणीचे आयोजन करून गुणानुक्रमे प्रवेश निश्चित केला जातो.

वैद्यकीय चाचणी- या चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाद्वारे चाचणी घेऊन क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारिरिक दृष्ट्या खेळाडूंची निवड अंतिम करण्यात येते.

सहभागासाठीचे विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड मोबाईल क्रमांक- 7219155252 यांच्याशी संपर्क साधावा. तरी इच्छुक खेळाडूंनी अर्ज सादर करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

# स्वामी विवेकानंद प्रशालेत प्रवेशोत्सव साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एन.ए.बी. संचलित स्वामी विवेकानंद प्रशाला एमआयडीसी सोलापूर येथे दि.16/06/2025 रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देवेंद्र भंडारे (माजी स्थायी सभापती) हार्दिक निमाणी (नॅब समाविष्ट सदस्य) व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक डॉ. हणमंत नारायणकर उपस्थित होते. प्रमुख अतिथींनी पुष्पवृष्टी करून विद्यार्थ्यांचे शाळेत स्वागत केले .कार्यक्रमाची सुरुवात भारताच्या प्रथम महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हवेत फुगे सोडून नवीन विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले व नवीन प्रवेश घेतलेल्या मुलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रमुख अतिथी यांनी मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व करियर कसे घडवावे याबाबत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक यांनी आपल्या मनोगतामध्ये अभ्यासाचे महत्त्व, स्पर्धा परीक्षा याविषयी आपले मत मांडले. याप्रसंगी सपताळे,कोळी, हिंगमिरे मॅडम, शिंदे, राठोड,निलंगीकर मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुभाष माने यांनी केले.

# ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत मोडनिंब,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १) | काटकर सर घर ते राजाभाऊ भोसले घर सिमेंट काँक्रीट रस्ता करणे. | २,६७,९४३/- | २००/- | ३ महिने | वर्ग सहा व त्यावरील |
| २) | वार्ड क्र ६ संतोष पांढरे घर ते लक्ष्मण मोहिते घर सिमेंट काँक्रीट रस्ता करणे. | १,८४,१८२/- | १००/- | ३ महिने | वर्ग सहा व त्यावरील |
| ३) | वार्ड क्र.६ संगीता घमे घराजवळ रिबोअर करणे,मोटर केबल संच टाकणे. | १,०९,३७६/- | १००/- | ३ महिने | वर्ग सहा व त्यावरील |
| ४) | प्रशांत कांबळे घर ते पाटील सर घर गटार करणे. | २७,९२७/- | १००/- | ३ महिने | वर्ग सहा व त्यावरील |
| ५) | वार्ड क्र.६ शिवाजीनगर येथे ओपन स्पेस प्रशांत शिंदे घराजवळ रिबोअर करणे. | १,४०,०००/- | १००/- | ३ महिने | वर्ग सहा व त्यावरील |
| ६) | सुरवसे वस्ती येथे स्ट्रीट लाईट बसविणे. | ४,००,०००/- | १००/- | ३ महिने | विद्युत ठेकेदार |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.१९/०६/२०२५ ते दि.२५/०६/२०२५ सुट्टीचे दिवस वगळून सायं ५.०० वा पर्यंत २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.२७/०६/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.३०/०६/२०२५ रोजी दु.०२.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत मोडनिंब,
ता.माढा,जि.सोलापूर

# पोलीस अधिकाऱ्यांकडून पालखी मार्गाची पाहणी, सोळाशे पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा सरहद्द नातेपुते येथे श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा ३० जून रोजी सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात धर्मपुरी येथे प्रवेश करणार आहे. जिल्ह्यातील पहिला मुक्काम नातेपुते याठिकाणी असणार आहे. त्या अनुषंगाने पोलिस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेची पाहणी



उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगांवकर, नातेपुते पोलिस स्टेशनचे सपोनी महारुद्र परजणे यानी धर्मपुरी स्वागत, कारुंडे विसावा, मोरोची, जिजाऊ चौक, शिखर शिंगणापूर चौक पानस्कर वस्ती विसावा या महामार्गावरील वाहतूक यांची पहाणी करून आवश्यकतेनुसार नाकाबंदी व बंदोबस्त लावण्याचे नियोजन केले आहे.

पालखी नातेपुते मुक्कामी आल्यानंतर या मार्गावर फोंडशिरस चौक, अण्णा भाऊ साठे चौक, शिंगणापूर पाटी येथील जिजाऊ चौक या ठिकाणी नाकाबंदी असणार आहे. पालखी तळावर कडेकोट बंदोबस्त ठेवून अनेकांच्या हालचालीवर सीसीटीव्ही द्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. सोलापूर जिल्हा सरहद्द धर्मपुरी पासून ते शिखर शिंगणापूर पाटील विसावा व नातेपुते मुक्कामाच्या ठिकाण वरील संपूर्ण पाहणी करून संबंधित पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी यांना पालखी सोहळा बंदोबस्ताच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. पालखी मार्ग पाहणी दौऱ्या दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगांवकर, नातेपुते पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक महारुद्र परजणे, पोलिस उपनिरीक्षक किशोर तनपुरे, अशोक खाडे, युवराज कणसे, महेश जाधव, संतोष वारे तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

पालखी सोहळ्यासाठी १६०० कर्मचारी बंदोबस्तात असून ४०० होमगार्ड, १०५० पोलिस, १५० अधिकारी तैनात केले आहेत. तसेच वॉटर फिलिंग पॉईंट, सोहळा मार्ग, पालखी क्रॉसिंग पॉईंट, याठिकाणीही बंदोबस्तात वाढ केली असून वारकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही, तसेच अपघातमुक्त वारी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पाळणे खेळणी मनोरंजन ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांची पेट्रोलिंग ठेवण्यात आली आहे. महिलांची छेडछाड होऊ नये म्हणून ठिकठिकाणी गर्दीच्या ठिकाणी महिला पोलिसांची नेमणूक केली असून गर्दीमध्ये चोरी होऊ नये म्हणून वारकऱ्यांच्या वेशभूषेत पोलीस गर्दीत नजर ठेवून असणार आहेत
**– महारुद्र परजणे**
( सहाय्यक पोलीस निरीक्षक, नातेपुते पोलीस ठाणे )

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | | ४ | ५ | | ■ | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | ■ | ८ | | ■ | ९ | |
| १० | ११ | | १२ | ■ | ■ | १३ | | | ■ | | ■ |
| १४ | | ■ | १५ | | ■ | १६ | | | ■ | १७ | १८ |
| १९ | | | ■ | ■ | २० | | | ■ | २१ | | |
| | ■ | ■ | २२ | २३ | | | ■ | २४ | | | ■ |
| | ■ | २५ | | | | ■ | २६ | ■ | २७ | | २८ |
| २९ | | | | ■ | | ३० | | ३१ | | ■ | |
| ■ | ■ | ३२ | ३३ | ■ | ३४ | | ■ | | ■ | ३५ | |
| ३६ | ३७ | | | ■ | ३८ | | ३९ | ■ | ४० | | ■ |
| ४१ | | ■ | ४२ | ४३ | ■ | ४४ | | ४५ | | ■ | ४६ |
| ४७ | | ■ | ४८ | | | | ■ | ४९ | | | |

**उभे शब्द :** १) सलमान खान, माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट २) सासरच्या विरूध्दार्थी ३) दिव्यातील प्रकाशमय वात ४) श्रीरामाचा जन्मदिवसाचा उत्सव ५) सूर्य, एक नाव ६) घड्याळ (हिंदीत) ९) भारतीय क्रिकेट टीममधील एक फलंदाज ११) आई (इंग्रजीत) १२) विषमच्या विरूध्दार्थी १३) नातेवाईक १८) झी मराठीवरील एक विनोदी मालिका-** हवा येऊ द्या २०) कंबर (इंग्रजीत) २१) सलमानच्या भावाचे नाव २२) झाड, वृक्ष २३) एक शेंगभाजी २५) गुलाबाच्या पाकळ्यांचा मुरांबा २६) मनसे अध्यक्षांचे फक्त नाव २८) शंभर धावा, सेंच्युरी ३०) तमाशातील कलावंत ३१) घर बांधकामासाठी वापरतात ती आयताकृती तुकडा ३३) सैन्याचा प्रमुख ३४) मत्स्य ३५) ऐश्वर्या राय अभिनीत एक हिंदी चित्रपट ३६) आकाशातील तारा (हिंदीत) ३७) थरथरणे ३९) रात्र (हिंदीत) ४०) वरचढ, श्रेष्ठ ४३) भारतीय क्रिकेट समालोचक -** शास्त्री ४५) एक म्हण-दाम करी ** ४६) पाच+दोन

**आडवे शब्द :** १) बजीरंगबलीचे एक नाव
३) मध्यप्रदेशचे युवा नेते -***** शिंदे
७) शिजविलेला तांदूळ
८) चित्त, बहिणाबाईंची एक कविता- ** वढाय वढाय
९) सिगारेटप्रमाणे तंबाखू टाकून बनविलेली एक वळी १०) आंब्याचा रस
१३) शीख धर्मियांचे एक गुरू ***
१४) अधिकाराचे स्थान, कवितेतील पद्य, पाऊल १५) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे १६) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १७) स्पर्श (इंग्रजीत)
१९) दक्षिणेकडील राज्य २०) कलम केलेले २१) महाराष्ट्रातील एक जिल्हा
२२) मनाची तळमळ २४) अकरा (इंग्रजीत) २५) आठवड्यातील एक वार
२७) पोरकट, लहान मुलासारखे वर्तन २९) आश्चर्य
३०) पर्यायी केलेली व्यवस्था ३२) श्रीकृष्णाचा मामा
३४) आईचा भाऊ ३५) दुधापासून बनविलेले एक पेय ३६) एक हिंदी चित्रपट - जो जिता वही **** ३८) पतीचे वडील ४०) मनाला लागून राहिलेली खंत ४१) उष्मा, त्रास ४२) दरवाजा ४४) गीत रचणारा ४७) शेत ४८) शालेय सुट्टीचा वार ४९) विचारविनिमय, सल्ला****

## सुडोकु - 279

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 6 | 8 | 7 | | 4 | |
| | 2 | | | | 3 | | 6 | |
| 6 | | | 2 | 5 | | 1 | | 7 |
| 1 | 3 | | | | | | | 5 |
| 5 | | | | | 2 | 7 | 3 | |
| 7 | 6 | 4 | | 3 | 8 | | | 9 |
| | | | 3 | | | | 2 | 6 |
| | 5 | 6 | | | 1 | 4 | 7 | 3 |
| | 4 | | 7 | 2 | | | | 1 |

# कोर्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात संपन्न

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मौजे कोर्टी, ता. पंढरपूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकुण ४६७ लाभार्थ्यांनी विविध योजनांचा लाभ घेतला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांची निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकालात काढणे. तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी कोर्टी, ता. पंढरपूर येथे शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

आमदार समाधान आवताडे, प्रांताधिकारी सचिन इथापे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधिक लाभांचे वाटप करण्यात आले. सदर शिबीरात महसूल विभागाच्या ३०६ लाभार्थ्यांनी उत्पन्नाचे दाखले, जातीचे दाखले, नॉनक्रिमिलेयर दाखले, वय व अधिवास दाखले तसेच चार इतर दाखले आदी योजनांचा लाभ घेतला त्याचबरोबर पुरवठा विभागाकडून ५१ शिधापत्रिका, त्याचबरोबर कृषी विभागाकडून १७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. कोर्टी ग्रामपंचायतीकडून १४ घरकुले व १० जॉबकार्डचा लाभ देण्यात आला. आरोग्य विभागाच्या माध्यमातून ६४ तर लेक लाडकी योजनेतून 5 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

सदर शिबीरात शासनाच्या विविध विभागांनी एकत्रितपणे सेवा उपलब्ध केल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना गावातच प्रशासनाची सेवा मिळाल्यामुळे समाधान व्यक्त केले असल्याची माहिती तहसिलदार लंगुटे यांनी दिली.

या शिबीरास गटविकास अधिकारी सुशील संसारे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, महिला व बालकल्याण विकास अधिकारी समाधान नागणे, तालुका कृषी अधिकारी श्री मोरे तसेच ग्रामस्थ व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय योग दिनामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- गणेश निराळी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** निरोगी आरोग्यासाठी ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने सोलापुरकरानी सहभागी व्हावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निराळी यांनी योग दिवस समन्वय समितीच्या बैठकीत केले.



केंद्रीय संचार ब्यूरो, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, योग दिवस समन्वय समिती आणि जिल्हा प्रशासन, सोलापूर यांच्या वतीने २१ जून रोजी साजरा होणा-या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्व नियोजनाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी निराळी बोलत होते.

यावेळी क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, ग्रामीण पोलीस उपअधीक्षक विजयालक्ष्मी कुर्री, तहसीलदार श्रीकांत पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, योग समन्वय समितीचे निमंत्रक मनमोहन भुतडा आणि आयुष अधिकारी डॉ विलास सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.

अंबादास यादव म्हणाले की, २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून जागतिक स्तरावर मोठया प्रमाणात साजरा केला जातो. यावर्षी देशभर एक लाख ठिकाणी 'योग संगम' साजरा करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने भारत सरकारची सर्व मंत्रालयाने उत्सफुर्तपणे सहभाग घेउन रोज 'कॉमन योग प्रोटोकॉल' प्रमाणे सराव करत आहेत. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही यावर्षीची संकल्पना आहे. यावर्षीचा हा अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिन हरिभाई देवकरण प्रशालेच्या क्रीडांगणावर दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ यावेळेत साजरा करण्यात येणार आहे. केंद्रिय संचार ब्युरोच्या वतीने दिनांक १९ ते २० जून पर्यंत हरिभाई देवकरण प्रशालेच्या मुळे सभागृहामध्ये मल्टीमीडिया चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या प्रदर्शनामध्ये भारतीय योग, विविध योगासने, प्राणायाम, ध्यान याविषयी माहिती देणारे चित्र व मजकुरासह लोकांना बघता येणार आहे. सदर प्रदर्शन सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य असणार आहे.

या बैठकीसाठी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे, नायब तहसिलदार एस सी परदेशीमठ, पोलीस निरीक्षक वैष्णवी पाटील, कार्यालय सहायक जे एम हन्नुरे, राज्य राखीव दलाचे सहायक समादेशक एम एच मते, जिल्हा होमगार्डचे मळसिद्ध कोकरे, मुख्य क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड, संचालक राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ राजेंद्र वडजे, सोलापूर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, भारत स्काऊट गाईड संघटक अनुसया शिरसाठ, श्रीधर मोरे, पतंजली योग पीठचे रघुनंदन भुतडा, रघुनंदन बनसोडे, विवेकानंद केंद्राचे रवी कंटली, महेश गोंजारी, योग साधना मंडळचे रोहिणी उपळाईकर, भारतीय योग संस्थाचे दत्तात्रय चिवडशेट्टी, गीतापरिवार सर्व कल्याण योगचे संगीता जाधव, सर्वोदय योग मंडळाचे जीवनकुमार अवताडे इत्यादी अधिकारी आणि योग संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ए. डी. जोशी ज्युनियर कॉलेजचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- ए. डी. जोशी ज्युनियर कॉलेजने एमएचटी-सीईटी परीक्षेत उज्ज्वल यश मिळल्याचे कॉलेजमधील हर्षाली शैलेशकुमार इंगळे हिने ९९.७४ पर्सेंटाइल गुण मिळवून कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला.



कॉलेजमधून परीक्षेस एकूण १२० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. एकूण प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ९५ पर्सेटाईलच्या वर १८ विद्यार्थी तर ९० पर्सेंटाइलच्यावर ४० विद्यार्थी आहेत.

**पीसीएम ग्रुप :**

चांदसाब उजळंवाले (९९.५६), योगेश क्षीरसागर (९९.३९), आदित्य यादव (९८.७८), ईश्वर येमूल (९८.६१), महेश चव्हाण (९७.९८), सार्थक बावीकर (९७.७६), रितेश मेंगझी (९७.५२), नयन कुलकर्णी (९७.४३), सायली दळवी (९६.३४), इस्माईल शेख (९६.०६).

**पीसीबी ग्रुप :**

हर्षाली इंगळे (९९.७४), सार्थकराजे चव्हाण (९९.६६), अर्जुन देशपांडे (९९.०५), हर्षाली मोरे (९८.२८), वैष्णवी कुंभार (९७.८५), घुगे निखिल (९७.१९), प्रतीक्षा म्हस्के (९६.५०), वैष्णवी सुर्वे (९५.३३).

या सर्व विद्यार्थ्यांनी ९५ च्यावर पर्सेंटाइल मिळवून घवघवीत यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी सायली जोशी, प्राचार्य प्रवीण देशपांडे व सर्व प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.

# टाकळी ते जुना गोपाळपूर रस्त्याच्या बाजूने वृक्षारोपण

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत तसेच तालुका पोलीस स्टेशन व स्वयरी कॉलेज गोपाळपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने लक्ष्मी टाकळी येथे टाकळी ते जुना गोपाळपूर रस्ता नुकताच मजबुतीकरण व सुधारणा करण्यात आली आहे त्या रस्त्याच्या दोन्हीही बाजूस तसेच शिवरील देवी मंदिराच्या बाजूने वृक्षारोपणाचा कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले याप्रसंगी हरित वारी ह्या उपक्रमात महाराष्ट्राचे प्रमुख आपल्या सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन करीत असताना टाकळी गावांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात आली. आज टाकळी ग्रामपंचायतने 1500 वृक्षरोपण करण्याचा संकल्प केला त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात करण्यात आली. त्याप्रसंगी



पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर टाकळी गावचे सरपंच संजय साठे तसेच माझी पोलीस अधिकारी नानासाहेब कदम तसेच पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचारी सेवेरी कॉलेजचे प्राध्यापक व विद्यार्थी तसेच पोलीस किसान संस्थेचे चेअरमन राजाभाऊ पाटील हनुमंत राव माने टाकळी गावचे उपसरपंच रूपाली ताई करंडे ग्रामपंचायत सदस्य औदुंबर ढोणे समाधान देठे सागर सोनवणे सचिन वाळके महादेव पवार खपले मेंबर नंदकुमार वाघमारे ग्रामविकास अधिकारी जयंत कुमार खंडागळे बापू उकिरडे व टाकळी ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या सरपंच संजय साठे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## जाहीर प्रसिद्धीकरण

दि.कि.अर्ज.नं. २८२/२०२५

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन पी.डि.चव्हाण सो.यांचे कोर्टात**

कृष्णाबाई सुरेश लोहार
वय- २७ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. सुभाष गल्ली, मु.पो.मैंदर्गी,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूध्द**

गिताबाई मल्लिनाथ सुतार
वय : ३५ वर्षे, धंदा : घरकाम,
रा. सुभाष गल्ली, मु.पो.मैंदर्गी,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. } **सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरीता दाखल केलेले आहेत. अर्जदार व सामनेवाली यांचे वडिल सुरेश मौनप्पा लोहार हे जानेवारी २०१० पासून मौजे मैंदर्गी येथील राहत्या घरातून ७ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून बेपत्ता झाल्याने, सुरेश मौनप्पा लोहार हे कायद्याने मयत असल्याबाबत गृहित आहे. सुरेश मौनप्पा लोहार यांच्या नावाची नोंद अ) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे मैंदर्गी नगरपरिषद हद्दीतील घरजागा मिळकत यांसी नगरपरिषद जुने मालमत्ता क्र. २९९ब यांसी नगरपरिषद नवीन मालमत्ता क्र. ०७०३०००१४९ यांसी एकूण क्षेत्र १४० चौ.मी. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत व त्यातील तद्भूत वस्तूसह . ब) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे मैंदर्गी (ग्रामीण) येथील शेतजमीन गट क्र.८१० यांसी सामाईक क्षेत्र १ हे. ६४ आर. यांसी आकार रु. ३=८७ पैसे. येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन व त्यातील तद्भूत वस्तूसह क) डि व सब डि सोलापूर पैकी तालुका अक्कलकोट पैकी मौजे मैंदर्गी (ग्रामीण) येथील शेतजमीन गट क्र. ७१२ यांसी सामाईक क्षेत्र ५ हे. ४२ आर. यांसी पो.ख. क्षेत्र ०.०१ आर. यांसी आकार रु.१२= ४४ पैसे येणेप्रमाणे वर्णनाची शेतजर्मन व त्यातील तद्भूत वस्तूसह. सदर मिळकतीचे उताऱ्यावरुन सुरेश मौनप्पा लोहार यांच्या नावाची नोंद कमी होऊन वारसदार म्हणून अर्जदार व सामनेवाली यांच्या भावाची नोंद होणे कामी वारसा दाखला मिळावा, या कारणासाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, जर कोणास वरील अर्जदार व सामनेवाली यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १९/०७/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची काही हरकत नाही असे समजून अर्जदार व सामनेवाली यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली असे दि.१८/०६/२०२५.

सही/-लिपीक (शिक्का) सही/- सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सोलापूर

# सोलापूरच्या बाजारात ५० पैशांना लिंबू, शेतकऱ्यासह व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बाजारात लिंबाचे दर इतके घसरले की विक्री अभावी लिंबू कचऱ्यात फेकण्याची वेळ आली आहे. उच्च प्रतीच्या लिंबांना प्रति किलो अवघा दहा ते बारा रुपये इतका भाव मिळत आहे. लिंबू दर कोसळण्याचा फटका शेतकऱ्याबरोबरच व्यापाऱ्यांनाही बसला आहे. किरकोळ बाजारातही एक रुपयांना दोन लिंबू मिळत आहेत.

पूर्व मोसमी पावसामुळे लिंबूचे संपूर्ण गणित बिघडले आहे. दुय्यम प्रतीचा लिंबू ग्राहकाअभावी कचऱ्यात फेकण्याची वेळ व्यापाऱ्यांवर आली आहे. उन्हाळ्यात सोन्याच्या दरात विकणारा लिंबू आज मातीमोल होत आहे. सध्याच्या दरात शेतकऱ्यांना उत्पादन खर्च काढणी खर्च सोडा वाहतूक खर्चही हातात पडत नसल्याची माहिती समोर येत आहे. मे महिन्यातच भरपूर



पाऊस पडल्यामुळे उशिरा येणारा लिंबू लवकरच बाजारात दाखल झाला. त्याचबरोबर मुबलक पाणी मिळाल्यामुळे लिंबूच्या आकारात फार मोठा बदल झाला. उत्तर भारतातील महानगरांमध्ये सोलापूर परिसरातून लिंबूची निर्यात होत होती. त्या ठिकाणीही पाऊस पडत असल्यामुळे लिंबू मागणी फारच रोडावली आहे. गेल्या आठवड्यापासून कित्येक व्यापाऱ्यांना खरेदी खर्चापेक्षाही कमी रक्कम विक्रीतून मिळाल्याचा दावा केला आहे.

सोलापूर बाजार समिती व परिसरातील बाजारातून आग्रा, जयपूर, इंदोर यासारख्या महानगरामध्ये लिंबू निर्यात होतो. मात्र दहा पंधरा दिवसांपासून या परिसरात पाऊस सुरू झाल्यामुळे मागणी ठप्प झाली आहे. या उलट बाजारात लिंबूची आवक फार मोठी वाढली यामुळे उत्पादकासह व्यापाऱ्यांच्याही फार मोठे नुकसान होत आहे.

१६६ क्विंटलची आवक मंगळवारी (ता. १७) सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात १६६ क्विंटल लिंबू आवक झाल्याची नोंद आहे. या लिंबूला प्रति किलो ५रुपये ते १४ रुपये इतका दर मिळाला आहे. एका किलोमध्ये उच्च प्रतीचे जवळपास ३० लिंबू बसतात तर दुय्यम प्रतीचे ५० ते ६०.

(नियम-७५ पहा)

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय : सौ. व्ही. ए. शिंदे, सहाय्यक सहकारी अधिकारी, अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.**

**सहकारी संस्थेचे नांव :- कै. शांताबाई हत्तुरे महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. इंगळगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७५ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सन २०२५-२६ ते सन २०३०-३१ या कालावधीसाठी सदस्यांच्या निवडणूकीकरीत मी कै. शांताबाई हत्तुरे महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. इंगळगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर, या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्याकरीता नियुक्त केलेली निवडणूक निर्णय अधिकारी याद्वारे कै. शांताबाई हत्तुरे महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. इंगळगी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूका नियत करीत आहे.

| अ.क्र. | मतदार संघाचे नांव | | नामनिर्देशन पत्र दाखल करावयाची अंतिम तारीख ठिकाण व वेळ | दाखल नामनिर्देशन पत्राच्या यादीची प्रसिध्दीची तारीख | नामनिर्देशन पत्राच्या छाननीची तारीख, वेळ व ठिकाण | विधीग्राह्य नामनिर्देशनाची सुचि प्रसिध्दीची तारीख, वेळ व ठिकाण | नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची तारीख, वेळ व ठिकाण | अंतिम विधीग्राह्य नामनिर्देशनाची यादी प्रसिध्दीची व उमेदवरांना निशानी वाटपाची तारीख, वेळ व ठिकाण | आवश्यक असल्यास मतदान ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख,वेळ व ठिकाण | मतमोजणीची तारीख, वेळ व ठिकाण | मतदानाचा निकाल जाहीर करण्याची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १) | सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | ०६ | दि.२३/०६/२०२५ ते २७/०६/२०२५ सकाळी ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निनिअ यांचे कार्यालयात) | जस जशी प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायंकाळी ४.०० नंतर (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.३०/०६/२०२५ वेळ सकाळी ११.०० वाजल्यापासून सहा. निबंधक (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०१/०७/२०२५ सकाळी ११.०० वा. निनिअ यांचे कार्यालयात | दि. ०१/०७/२०२५ ते दि. १५/०७/२०२५ सकाळी ११.०० ते दु.०३.०० वा. पर्यंत निनिअ यांचे कार्यालय | दि. १६/०७/२०२५ रोजी स. ११.०० वा. निनिअ यांचे कार्यालयात | दि.२६/०७/२०२५ रोजी सकाळी ०९.०० ते दु.०५.०० वा. पर्यंत जिल्हा प्राथमिक शाळा, इंगळगी येथे | दि.२६/०७/२०२५ रोजी मतदान संपल्यानंतर लगेच,ठिकाण जिल्हा प्राथमिक शाळा,इंगळगी येथे | दि.२६/०७/२०२५ रोजी मतमोजणी संपल्यानंतर लगेच,ठिकाण जिल्हा प्राथमिक शाळा,इंगळगी येथे |
| २) | महिला राखीव प्रतिनिधी | ०२ | | | | | | | | | |
| ३) | अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती प्रतिनिधी | ०१ | | | | | | | | | |
| ४) | इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | ०१ | | | | | | | | | |
| ५) | भ. वि.जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग | ०१ | | | | | | | | | |
| | एकूण :- | ११ | | | | | | | | | |

(१) सदर निवडणूक ही महाराष्ट्र सहकरी संस्थांच्या समितीची निवडणूक नियम २०१४ मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निवडणूकीसंदर्भात नामनिर्देशन, चिन्ह वाटप, आचारसंहिता, खर्चाची कमाल मर्यादा, मतपेटी व इतर निवडणूक संबंधिचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेश, अधिसुचना व परिपत्रकीय सुचनेनुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाईल.

(२) महाराष्ट्र सहकारी सस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३ तरतुदीप्रमाणे प्रत्येक नामनिर्देशन अर्जाची किंमत रू १००/- राहील. नामनिर्देशन अर्ज भरताना अनु.जाती / जमाती उमेदवारांसाठी रू.२००/- व अनु.जाती /जमाती उमेद्वारांव्यतिरिक्त इतर सर्व उमेद्वारांसाठी नामनिर्देशन अर्जासोबत रक्कम रू.१००० अनामत ठेव भरून पावती सोबत जोडावी.

(३) अनुसूचित जाती/जमाती, इतर मागासवर्ग तसेच भटक्या विमुक्त जाती/जमाती, विशेष मागास प्रवर्गातील जातीचे दाखले सक्षम अधिका-याच्या सही व शिक्कयानिशी सत्यप्रति नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा नामिनिर्देशन पत्राचा विचार केला जाणार नाही.

(४) सदरचा निवडणूक कार्यक्रम शासकिय सुट्टया वगळून राहील.

निवडणूक निर्णय अधिकारी यांचा संपर्क क्र. ८४२१३८६२०४

**सही/-**
**तालूका निवडणूक निर्णय अधिकारी, तथा**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, ता. दक्षिण सोलापूर**

**सही/-**
**(व्ही. ए. शिंदे)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**
**कै. शांताबाई हत्तुरे महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.इंगळगी,**
**ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर**